नियमीत फौजदारी खटला क्रमांक ७२०/२०२३
शासन विरुध्द मोनु उर्फ राजेंद्र
कलम ३८० भादंसं
निशाणी क्रमांक १२

अभियोग पक्षाचा साक्षीदार ४ ची जबानी
मी शपथेवर सत्य निवेदन करतो की,

माझे नावः- संपत रंगनाथ चेमटे
वयः- ४५ वर्षे धंदाः- सहा. पोलीस निरीक्षक
रा. वरळी पोलीस ठाणे, मुंबई.

सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्तया श्रीमती भोसले यांच्याकडुन

१. सदर घटना दिनांक ०९/१२/२०२२ रोजी घडली. त्यावेळी मी वरळी पोलीस ठाण्यात दिवसपाळी ठाणे अंमलदार कर्तव्यावर होतो. तेव्हा फिर्यादीने पोलीस ठाण्यात येवुन घरातुन मोबाईल चोरी झाल्याबाबत तक्रार केली. निशाणी क्रमांक ०६ वरिल ती तक्रार आता मला दाखवण्यात आली, त्यावर समक्ष म्हणुन माझी सही आहे. त्यातील मजकुर फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे लिहला असुन तो बरोबर आहे.

२. त्यानंतर सदर मोबाईलमध्ये असलेल्या सिमकार्डचा तपशील व त्या मोबाईलचा आयएमईआय क्रमांक काढुन त्यामध्ये नवीन सिमकार्ड चालु झाले आहे काय याचा शोध घेतला. त्यावेळी मोबाईलच्या आयएमईआय क्रमांकावरुन चोरी झालेल्या दिनांकानंतर नविन सिमकार्ड चालु झाल्याचे आढळले. त्यानंतर त्या नविन सिमधारकाकडे जावुन तो मोबाईल त्याच्याकडे कसा आला याबाबत तपास केला. सिमकार्ड धारक श्री. साळवे यांनी सांगितले की, आरोपी राजु मुन्नर यादवने तो मोबाईल त्याला दिला होता. आरोपी हा सदर इसमाच्या व्यवसायाशी संबंधीत होता. त्यानंतर तो मोबाईल पंचनाम्याने ताब्यात घेतला. तो सादर पंचनामा आता मला दाखवण्यात आला. त्यावर माझी, पंचाच्या व मोबाईल सादर करणा-या व्यक्तीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो सादर पंचनामा निशाणी क्रमांक १३ वर आहे.

३. ज्या इसमाने मोबाईल साळवे यांना दिला होता, त्याचा शोध सुरु केला. राजु मुन्नर यादव हा मालाड पोलीस ठाण्यातील गुन्हयात कारागृहात होता. त्यानंतर त्याला या गुन्हयात अटक केली. त्यानंतर तपासांती मी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकेन, तो आज न्यायालयात आभासी पध्दतीने हजर आहे. या गुन्हयात जप्त मुद्देमाल पाहिल्यास मी ओळखु शकेन.
सरतपास पुर्ण.

आरोपीच्या विद्वान वकीलांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर.

उलट तपास आरोपीकरिता आरोपीकडुन स्वतः

नाकारला.

दिनांक १४/१२/२०२३

समक्ष/ श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

महानगर दंडाधिकारी
६२ वे न्यायालय, दादर, मुंबई